महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

http://admission.dvet.gov.in; www.dvet.gov.in; itiadmission@dvet.gov.in

## शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०१८ सत्रासाठी प्रवेश सूचना

## GOVERNMENT & PRIVATE ITI ADMISSION NOTIFICATION FOR AUGUST २०१८ SESSION

(Admission Notification No.: 2018/02 Dated 17th June, 2018)

# http://admission.dvet.gov.in

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०१८ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पध्दतीने करण्यात येत असून प्रवेशाची सविस्तर "माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती"सर्व शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थांमध्ये दि. १ जून, २०१८ पासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. (रु.६० मात्र) तसेच सदर माहितीपुस्तिका प्रवेश संकेत स्थळावर Pdf स्वरुपात Download साठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना प्रवेश प्रक्रीयेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये दि. १ ते ३० जून, २०१८ दरम्यान रोज सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत नि:शुल्क मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आलेले आहे. सदर सुविधेचा सर्व उमेदवारांनी लाभ घ्यावा. सर्व सुट्टीच्या दिवशी देखील मार्गदर्शन सत्र व प्रवेशप्रक्रीया सुरू राहील.

प्रवेश पध्दती, नियमावली, प्रवेश संकेतस्थळाबाबत तांत्रिक व तद्नुषंगिक शंका असल्यास संचालनालयाच्या मदत कक्षास संकेतस्थळावर देण्यात आलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. सदर मदत कक्षास संपर्क साधण्यापूर्वी माहितीपुस्तिका अभ्यासावी.

### अर्ज करण्याची पध्दत

१. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रवेश प्रक्रीयेत सहभागी असून सर्व संस्था प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असतील. अर्ज स्विकृती केंद्रात उमेदवार माहितीपुस्तिका प्राप्त करु शकतील तसेच ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे / पडताळणी / स्विकृती आणि निश्चिती करु शकतील

२. प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, प्रवेश पध्दती व नियमांचा अभ्यास करुनच ऑन लाईन प्रवेश अर्ज सादर करावा

३. ऑन लाईन प्रवेश अर्ज http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर दि. १ जून, २०१८, सकाळी ११.०० वा. पासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे

४. अर्ज कोणत्याही ऑन लाईन स्त्रोतामधून भरता येईल. उमेदवारांना माहिती पुस्तिकेतील प्रपत्र - ४ मध्ये नमूद शुल्क भरुन अर्ज स्विकृती केंद्रामधून ही सुविधा उपलब्ध होऊ शकेल

५. ऑन लाईन अर्जात प्राथमिक माहिती भरल्यानंतर उमेदवारांचे प्रवेश खाते (Admission Account) त्यांचा नोंदणीक्रमांक (Registration Number) हाच User ID म्हणून तयार होईल

६. उमेदवाराने संपुर्ण प्रवेश अर्ज भरल्यानंतर तात्पुरत्या प्रवेश अर्जाची (Provisional Application Form) छापील प्रत (Print Out) घ्यावी व प्रवेश अर्ज निश्चित करावा (Confirmation)

७. प्रवेश अर्ज निश्चितीसाठी (Application Confirmation) व प्रवेश निश्चितीसाठी (Admission Confirmation) उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ सर्वसाधारणपणे खालील दस्तऐवज/ प्रमाणपत्रांची आवश्यकता भासणार आहे.

   ७.१ माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षेची (SSC) गुणपत्रिका, अलीकडील शिक्षण घेतलेले शाळा अथवा महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र आणि आधार कार्ड – सर्व उमेदवारांसाठी अनिवार्य

   ७.२ मागास प्रवर्गातील सर्व उमेदवारांसाठी जात प्रमाणपत्र व दि. ३१ मार्च, २०१९ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून)

   ७.३ उमेदवार / उमेदवाराची आई / उमेदवाराचे वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)

   ७.४ उमेदवाराचे आई / वडील केंद्र शासनाचे / केंद्रशासनाच्या उपक्रमामधील / महाराष्ट्र राज्य शासन/ महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असल्याचे कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)

   ७.५ उमेदवार/ उमेदवाराची आई / उमेदवाराचे वडील संरक्षण सेवेत कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)

   ७.६ उमेदवाराच्या अपंगत्वाचा प्रकार, अपंगत्वाची टक्केवारी, कायम स्वरुपी अपंगत्व याबाबतचा स्पष्ट उल्लेख असलेल्या वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)

   ७.७ अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी धर्माबाबतचे प्रमाणपत्र अथवा उमेदवार मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि जैन धर्मात मोडतो ह्याचा उल्लेख असलेले शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)

   ७.८ गुणाधिक्य पुष्ट्यर्थ इतर प्रमाणपत्र जसे इंटरमिडीएट चित्रकला श्रेणी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, एनसीसी/ एमसीसी/ स्काऊट गाईड/ सिव्हील डिफेन्स गाईड, सक्षम प्राधिकाऱ्याचे खेळाचे प्रमाणपत्र, बोर्स्टर स्कूल उमेदवार असल्याबाबत प्रमाणपत्र, अनाथाश्रमात वास्तव्य असल्याबाबत प्रमाणपत्र (लागू असल्यास)

८. **प्रवेश अर्ज निश्चित करणे (Confirmation):**

   ८.१ तात्पुरत्या प्रवेश अर्जाची छापील प्रत (Print Out), उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ दस्तऐवज, कागदपत्रांचा स्वयं सत्यापित छायांकीत प्रतींचा (Self-Attested Photocopy) एक संच व लागू असलेले अर्जशुल्क राज्यातील कोणत्याही शासकीय वा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अर्ज निश्चितीसाठी सादर करावीत

   ८.२ अर्ज स्विकृती केंद्रामधील अधिकारी हे अर्जाची छापील प्रत (Print Out) व उमेदवारांने सादर केलेल्या मूळ दस्तऐवजावरुन काळजीपूर्वक तपासणी करतील. तपासणीनंतर अर्जाचे निश्चितीकरण करुन उमेदवारास "अर्ज निश्चितीकरण पावती" (Application Confirmation Slip) व निश्चित केलेल्या प्रवेश अर्जाची (Confirmed Application Form) प्रत देतील

९. निश्चित केलेल्या प्रवेश अर्जांचाच सर्व प्रवेश फेऱ्यांकरिता विचार करण्यात येईल. निश्चित न केलेले अर्ज प्राप्तच झाले नाहीत असे समजण्यात येईल

१०. प्रवेश अर्ज निश्चित केल्यावरच (Confirmation) पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक (Registration Number) व पासवर्ड (Password) व्दारे प्रवेश (Login) करुन "Submit/ Change Options/ Preferences" व्दारे सादर करावेत.

११. पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य पूर्ण भरल्यानंतर Option Form ची छापील प्रत (Print Out) घ्यावी.

१२. उमेदवाराने एकच अर्ज निश्चित करावा. एकापेक्षा जास्त अर्ज निश्चित केल्यास त्या उमेदवाराचे सर्व अर्ज रद्द होतील. अशा उमेदवाराची निवड झाल्यास वा चुकीने प्रवेश देण्यात आला असल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल व उमेदवार संपूर्ण प्रवेशप्रक्रीयेतुन बाद होईल.

१३. अनिवासी भारतीय व इतर राज्यातील रहिवासी असलेल्या उमेदवारांनी देखिल दि. १ जून, २०१८ पासूनच ऑन लाईन प्रवेश अर्ज व चौथ्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे आवश्यक आहे.

१४. प्रत्येक प्रवेश फेरीत निवड झालेल्या उमेदवारांना निवडपत्र (Allotment Letter) Online उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी उमेदवारांनी आपल्या Account ला Login करुन निवडपत्राची प्रिंट घेवून निवड झालेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित रहावे. उमेदवारांना निवडपत्राची (Allotment Letter) छापील प्रत (Print Out) ज्या संस्थेत त्याची निवड झाली त्या संस्थेत देखिल घेता येईल.

१५. **प्रवेशअर्ज शुल्क:**

१५.१ अराखीव प्रवर्ग उमेदवार (Unreserved Category) = रु. १५०

१५.२ राखीव प्रवर्ग उमेदवार (Reserved Category) = रु. १००

१५.३ महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार (Outside Maharashtra State) = रु. ३००

१५.४ अनिवासी भारतीय उमेदवार (Non Residential Indian) = रु. ५००

## प्रवेशाचे वेळापत्रक

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१.०** | **ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे** | | |
| १.१ | ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरूस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज पुर्ण भरल्यानंतर प्रवेश अर्जाची छापिल प्रत (Print Out) घेणे | ०१ जून, २०१८<br>स. ११.०० वाजेपासून | ३० जून, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **२.०** | **प्रवेश अर्ज निश्चित करणे** | | |
| २.१ | अर्ज स्विकृती केंद्रात (राज्यातील शासकीय वा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत) मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज शुल्क भरुन अर्ज निश्चित (Confirmation) करणे | ०४ जून, २०१८<br>स. ११.०० वाजेपासून | ०२ जुलै, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **३.०** | **पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे** | | |
| ३.१ | प्रवेश अर्ज निश्चित केल्यावरच पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक (Registration No.) व पासवर्ड (Password) व्दारे प्रवेश (Login) करुन सादर करावेत. | ०४ जून, २०१८<br>स. ११.०० वाजेपासून | ०३ जुलै, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **४.०** | **प्राथमिक गुणवत्ता यादी** | | |
| ४.१ | प्राथमिक गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | ०५ जुलै, २०१८, स. ११.०० वाजता | |
| **५.०** | **गुणवत्ता यादी बाबत हरकती नोंदविणे** | | |
| ५.१ | गुणवत्ता यादीबाबत हरकती असल्यास प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या प्रपत्रात लेखी स्वरुपात नजीकच्या शासकीय वा खाजगी औ.प्र.संस्थेत व्यक्तिश: हजर राहुन हरकत नोंदविणे | ०५ जुलै, २०१८<br>स.११.०० वाजेपासून | ०६ जुलै, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **६.०** | **अंतिम गुणवत्ता यादी** | | |
| ६.१ | अंतिम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | १० जुलै, २०१८, सायं.५.०० वाजता | |
| **७.०** | **पहिली प्रवेश फेरी** | | |
| ७.१ | पहिल्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | १० जुलै, २०१८, सायं. ५.०० वाजता | |
| ७.२ | पहिल्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या **पहिल्या विकल्पानुसार** जागा मिळाल्यास उमेदवाराला प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या ते चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र. २ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या दुसऱ्या ते चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | ११ जुलै, २०१८<br>स.९.०० वाजेपासून | १५ जुलै, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **८.०** | **दुसरी प्रवेश फेरी** | | |
| ८.१ | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील. | ११ जुलै, २०१८<br>स.९.०० वाजेपासून | १६ जुलै, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ८.२ | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | २० जुलै, २०१८, सायं. ५.०० वाजता | |
| ८.३ | दुसऱ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या **पहिल्या तीन विकल्पांपैकी** कोणत्याही एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रिय प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र. ४ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | २१ जुलै, २०१८<br>स.९.०० वाजेपासून | २५ जुलै, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **९.०** | **तिसरी प्रवेश फेरी** | | |
| ९.१ | तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यांत येतील. | २१ जुलै, २०१८<br>स.९.०० वाजेपासून | २६ जुलै, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ९.२ | तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | ३० जुलै, २०१८, सायं. ५.०० वाजता | |
| ९.३ | तिसऱ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमांकाच्या **पहिल्या पाच विकल्पांपैकी** एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या चौथ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.६ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या चौथ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | ३१ जुलै, २०१८<br>स.९.०० वाजेपासून | ०३ ऑगस्ट, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **१०.०** | **चौथी प्रवेश फेरी** | | |
| १०.१ | चौथ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यांत येतील. | ३१ जुलै, २०१८<br>स.९.०० वाजेपासून | ०४ ऑगस्ट, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |
| १०.२ | चौथ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | ०७ ऑगस्ट, २०१८, सायं. ५.०० वाजता | |
| १०.३ | चौथ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या कुठल्याही **एका विकल्पानुसार जागा** मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. | ०८ ऑगस्ट, २०१८<br>स.९.०० वाजेपासून | ११ ऑगस्ट, २०१८<br>सायं.५.०० वाजेपर्यंत |

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **११.०** | **नव्याने ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे :** | | |
| ११.१ | विहीत मुदतीत प्रवेश अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांना समुपदेशन फेरीत संधी उपलब्ध करुण देण्यासाठी ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरूस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज पुर्ण भरल्यानंतर प्रवेश अर्जाची छापिल प्रत (Print Out) घेणे, अर्ज स्विकृती केंद्रात (राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थेत) मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज शुल्क भरुन अर्ज निश्चित (Confirmation) करणे | २५ जुलै, २०१८ स.९.०० वाजेपासून | ११ ऑगस्ट, २०१८ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ११.२ | समुपदेशन फेरीसाठी पात्र उमेदवार व नव्याने अर्ज भरलेल्या उमेदवारांची समुपदेशन फेरीसाठी एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | १३ ऑगस्ट, २०१८, सायं. ५.०० वाजता | |
| **१२.०** | **शासकीय औ.प्र. संस्थांसाठी संस्थास्तरीय समुपदेशन फेरी** | | |
| १२.१ | **फक्त शासकीय औ.प्र.संस्थातील** चौथ्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा संबंधित शासकीय औ.प्र. संस्थाना संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित करणे. | १३ ऑगस्ट, २०१८, सायं. ५.०० वाजता | |
| १२.२ | औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत व्यक्तीशः हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदवावी. | १४ ऑगस्ट, २०१८ स.८.०० वाजेपासून | १४ ऑगस्ट, २०१८ दु.३.०० वाजेपर्यंत |
| १२.३ | हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून संबंधित संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करणे. | १४ ऑगस्ट, २०१८, सायं.५.०० वाजता | |
| १२.४ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल. | १६ ऑगस्ट, २०१८ स.८.०० वाजेपासून | १८ ऑगस्ट, २०१८ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| १२.५ | सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत **त्याच दिवशी प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.**<br>उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | १६ ऑगस्ट, २०१८ स.८.०० वाजेपासून | १८ ऑगस्ट, २०१८ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **१३.०** | **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश** | | |
| १३.१ | खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व चौथ्या प्रवेश फेरीनंतर खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औ.प्र.संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध होतील | ११ जुलै, २०१८ स.९.०० वाजेपासून | ३१ ऑगस्ट, २०१८ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| १३.२ | खाजगी औ.प्र.संस्थांना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध जागांचा तपशील प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध राहील | | |
| १३.३ | ज्या उमेदवारांची खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर प्रवेश घेण्यांची इच्छा आहे त्यांनाही त्यांची तपशिलवार माहितीसह प्रवेश संकेत स्थळावर नोंदणी (Registration) करावी लागेल | | |
| १३.४ | नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावावयाचा आहे त्या संस्थेत व्यक्तीशः हजर राहुन सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी | | |

**महत्वाची सुचना :**

१. संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेबाबत उमेदवारांना वेळोवेळी SMS व्दारे माहिती व OTP (One Time Password) कळविण्यात येईल तथापि, उमेदवारांनी आपला अद्ययावत भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile Number) ऑनलाइन प्रवेश अर्जात “Primary Mobile Number” म्हणून नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर भ्रमणध्वनी क्रमांक प्रवेश प्रक्रिये दरम्यान बदलू नये.

२. उमेदवाराने त्याच्या प्रवेश खात्याचा (Admission Account) पासवर्ड (Password) कोणासही देऊ नये व त्यासंबंधी संपूर्ण गोपनीयता पाळावी. Password विसरल्यास तो Reset करण्याची सुविधा प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) अंतर्गत राज्यात असलेल्या २५० औ.प्र.संस्थांमधील ठराविक अभ्यासक्रमातील २०% जागा या माहिती पुस्तिकेत दिलेले "विशेष प्रशिक्षण शुल्क" आकारुन गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. त्या जागांसाठी इच्छुकांना Online प्रवेश प्रक्रीयेत स्वतंत्र विकल्प (Option) देण्याची मुभा राहणार आहे. उदा. Fitter-IMC, Welder-IMC, etc. उमेदवारांनी अशा जागांसाठी विकल्प सादर करण्यापूर्वी माहितीपुस्तिकेत प्रशिक्षण शुल्काबाबत (मुद्दा क्र. १५.१) माहिती वाचावी

४. प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ज्या शासकीय औ. प्र. संस्थांमधील व्यवसायांत एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाले असतील त्या व्यवसायातील प्रवेशित उमेदवारांना त्याच संस्थेत इतर व्यवसायात किंवा जवळच्या दुसऱ्या शासकीय औ.प्र. संस्थेतील संबंधित व्यवसायात सामावून घेण्यांत येईल (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. २२.१)

५. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतील सर्व प्रकारच्या जागांसाठी प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने होत असून केंद्रीय पध्दतीत उपलब्ध जागा व संस्थास्तरावरील जागांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औ.प्र. संस्थांनी नोंद घ्यावी.

६. केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेत सहभागी खाजगी औ.प्र.संस्था व त्यातील व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्या हया कायम विनाअनुदानित तत्वावर शासन मान्यताप्राप्त व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) यांचेशी संलग्न आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांमधील प्रवेशित व प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांची परीक्षा - अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा (AITT) ही शासकीय औ.प्र.संस्थांतील उमेदवारांप्रमाणेच घेण्यात येवून उत्तीर्ण उमेदवारांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) बहाल करण्यात येते. उमेदवारांनी खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांसाठी प्रवेश घेण्याअगोदर, ते ज्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेत आहेत ती व्यवसाय अभ्यासक्रमाची तुकडी NCVT शी संलग्नित आहे का ते NCVT-MIS पोर्टल www.ncvtmis.gov.in वर ITI Search या मथळ्या खाली तपासावे. असंलग्नित व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांची परीक्षा संचालनालया मार्फत घेण्यात येणार नाही.

७. राज्यातील सर्व शासकीय व मान्यता प्राप्त खाजगी औ.प्र. संस्था व या संस्थेतील संलग्न व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांची यादी http://admission.dvet.gov.in, www.dvet.gov.in तसेच www.ncvtmis.gov.in या संकेतस्थळांवर देखिल उपलब्ध आहे. तरी प्रवेशोच्छुक सर्व उमेदवारांनी सदर संकेतस्थळांना एकवेळ अवश्य भेट दयावी.

८. **वरील प्रवेश वेळापत्रक सूचक दर्शक असून त्यात बदल संभवतो. अद्ययावत प्रवेश वेळापत्रक प्रवेश संकेतस्थळावर व सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच नोंदणीकृत उमेदवारांना SMS व्दारे वेळोवेळी कळविण्यात येईल तसेच संपूर्ण प्रवेश प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी वेळोवेळी प्रवेश संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.**

Sd/-
( ई. रविंद्रन, भा.प्र.से.)
संचालक

स्थळ: मुंबई
दि.: १७ जून, २०१८